PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Mumbaicha Fauzdar
Year: 1985

Song: Kasa Navsan Mala Milala
Lyricist: Jagdish Khebudkar

कसा नवसानं मला मिळाला
जीवाचा जोडीदार
कसा नवसानं मला मिळाला
कसा नवसानं मला मिळाला
जीवाचा जोडीदार
कसा ममईचा
कसा ममईचा
कसा ममईचा फौजदार
कसा नवसानं मला मिळाला

लेफ्ट राईट लेफ्ट
लेफ्ट राईट लेफ्ट
लेफ्ट राईट अबाऊट टर्न

पाचूंदाभर मिशा व्हटावर
रुबाब त्याचा न्यारा
पाचूंदाभर मिशा व्हटावर
रुबाब त्याचा न्यारा
नव्या बूटाचा आवाज ऐकून
गाव हादरतो सारा
लोक म्हणतील बघून त्याला
लोक म्हणतील बघून त्याला
कोन गं ह्यो सरदार

कसा ममईचा
कसा ममईचा
कसा ममईचा फौजदार

कसा नवसानं मला मिळाला

चाय लाव
हा साब
खाना लाव
जी हूजूर
बैठ जाओ
हा सरकार

संसाराच्या चौकीमधनं
आरडर सोडेंल कशी
संसाराच्या चौकीमधनं
आरडर सोडेंल कशी
लाडीगोडीने मर्जी राखून
हा लाडीगोडीने मर्जी राखून
करील त्याची खुशी
हौस हौसांन नव्या घराचा
हौस हौसांन नव्या घराचा
सजवीन मी संसार

कसा ममईचा
कसा ममईचा
कसा ममईचा फौजदार

कसा नवसानं मला मिळाला

भागो दौडो पकडो

चोर दरोडेखोरासंग
करील फायटींग जोरात
चोर दरोडेखोरासंग

करील फायटींग जोरात
मर्दुमकीचा टिळा लावूनी
ववाळीन मी दारात
दिवसाढवळ्या लूटल कधी ना
दिवसाढवळ्या लूटल कधी ना

बाई माझा भरतार
कसा ममईचा
कसा ममईचा
कसा ममईचा फौजदार

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*